Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-VII July 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - III Issue-VII JULY 2016 ISSN 2349-638x Impact Factor 2.147

शिक्षक प्रशिक्षणाची सद्यस्थिती व अध्यापक महाविद्यालयांच्या गुणवत्ता विकासात नॅकची भूमिका

डॉ. कैलास सर्जेराव मोटे
अधिव्याख्याता,
साई जनविकास प्रतिष्ठानचे पदव्युत्तर शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
आळणी, उस्मानाबाद

प्रास्ताविक :-

भारतीय शिक्षण व्यवस्थेत शिक्षकाला मानाचे स्थान आहे कारण शिक्षक हा समाजनिर्माता आहे. सदाचारी, ज्ञाननिर्माता म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. शिक्षक होऊ इच्छिणाऱ्याला प्रशिक्षण देणेची केंद्रे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्राचिन काळापासून भारतात अस्तित्वात आहेत. ज्या विद्यार्थ्यामध्ये सादरीकरण, विषय ज्ञान, प्रगल्भ नेतृत्त्व शैली, समायोजन क्षमता आहे अशाच विद्यार्थ्यांना शिक्षक होण्याचा मान पूर्वी मिळत असे. इंग्रजी अंमलापासून शिक्षक प्रशिक्षणाला औपचारीक सुरुवात भारतामध्ये १८०२ मध्ये विल्यम कॅरे यांच्या प्रेरणेतून झाली. उददेश असा होता की शिक्षक होऊ इच्छिनाऱ्याला आपल्या ज्ञानात वृध्दी करता यावी. त्यांच बरोबर अध्यापन कसे करावे, कोणाला, केव्हा, कोणी, काय शिकवावे या बाबी लक्षात याव्यात यासाठी शिक्षक प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. जेव्हा शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होईल तेव्हाच बालकाचा गुणात्मक विकास होण्यास मदत होईल व राष्ट्र विकास व राष्ट्राच्या उन्नतीस मदत होईल. त्याच बरोबर भारतीय संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन होईल वरील बाबी साध्य करण्यासाठी शिक्षकामध्ये शिक्षकी पेशाचे गुण, नवनिर्माण क्षमता व संशोधन वृत्ती निर्माण व्हावी ही शिक्षक प्रशिक्षणाची खरी भूमिका आहे.

अध्यापक विद्यालये व महाविद्यालयातून प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देतांना वेगवेगळया संकल्पनांचा अभ्यास दिला जातो. प्रशिक्षणार्थ्याला फक्त अध्यापन करता येऊन भागत नाही तर त्याला आपल्या अध्यापनात निर्माण होणाऱ्या समस्यांचा व विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या समस्यांचा ही शोध घेता यावा व त्या समस्या शास्त्रीय पध्दतीने सोडवता याव्यात, त्याच बरोबर नवोपक्रम राबवून /तयार करून त्याची अंमलबजावणी करता यावी. यासाठी शिक्षक प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. वर्गात अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांची बौध्दिक कार्यक्षमता एक सारखी नसते हे ओळखून सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेच्या समपातळीवर आणता यावे. या बाबींचा विचार करूनच शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी करण्यात आलेली आहे. प्रभावी व गुणवत्तापूर्ण शिक्षण पध्दतीचे ध्येय्य साध्य करावयाचे असेल तर त्यासाठी अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये बदल होणे अपेक्षीत आहे. काळानुसार अभ्यासक्रम व अध्यापन पध्दती यामध्ये बदल अपेक्षीत आहे. कारण येणारा काळ हा नवनवीन बदलाला आव्हाणे देऊन नवीन आव्हाणे निर्माण करणारा काळ आहे. सद्याचा काळ हा नॅनो टेक्नॉलॉजी व वाय फाय तंत्रज्ञानाचा काळ आहे. पुढील काळ यापेक्षा ही वेगळा असणार आहे. त्यामुळे या भविष्यकालीन घटना, प्रसंगाचा अंदाज बांधून शिक्षक प्रशिक्षणामध्ये बदल करणे आवश्यक आहे. येणाऱ्या काळामध्ये शिक्षकाने Research कार्यापेक्षा Invention आणि Discovery यावर भर देणे आवश्यक आहे. संशोधन भरपूर झाले संशोधनात रिमेकचा प्रकार पुढे येऊ लागला आहे यामुळे नाविण्याचा अभाव दिसून येत आहे. संशोधकांनी संशोधनापेक्षा Invention आणि Discovery यावर येणाऱ्या काळामध्ये अधिक भर

देणे आवश्यक आहे. कारण यामुळे नवराष्ट्र निर्माण होण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ निर्माण होण्यास मदत मिळेल. या बाबीचा विचार शिक्षक प्रशिक्षणामध्ये बदल होणे अपेक्षित आहे. तेव्हाच नवोपक्रमशिल शिक्षक निर्माण होण्यास मदत होईल.

सद्यस्थितीत शिक्षक प्रशिक्षणापुढील आव्हाणे :-

शिक्षक प्रशिक्षणाचा विचार करता आज शिक्षक प्रशिक्षणापुढे अनेक आव्हाणे आहेत. वाढती अध्यापक महाविद्यालये यामुळे गुणवत्तेवर परिणाम होऊ लागला आहे. आज तर अध्यापक विद्यालयाकडे विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणावर पाठफिरवली आहे याचे कारण जेव्हा आपण शोधतो तेव्हा असे लक्षात येते की, अध्यापक महाविद्यालयातून राबविण्यात येणारे शिक्षक प्रशिक्षण व शासनाचे उदाशिन धोरण या गोष्टी शिक्षक प्रशिक्षणाच्या खालवलेल्या दर्जाला जबाबदार आहेत. आज विद्यार्थ्यांना शिक्षण प्रक्रियेत नवे बदल हवे आहे. बुध्दीला आव्हाण देणारी शिक्षण पध्दती विद्यार्थ्यांना हवी आहे आणि याचा बबीचा अभाव अध्यापक महाविद्यालयातून दिल्याजाणाऱ्या शिक्षण पध्दतीमध्ये दिसून येतो. आज तंत्रज्ञानाच्या विकासामुळे विद्यार्थीला हवे ते ज्ञान प्राप्त करण्यासाठी घर बसल्या अनेक कार्यवाहीन्या, संगण, इंटरनेट, वॉटसॲप, ई-मेल या माध्यमाव्दारे उपलब्ध होऊ लागले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात विद्यार्थ्याला शिक्षकांची गरज भासणार नाही. शिक्षकाचे जर अस्तित्त्व टीकवून ठेवायचे असेल व भारतीय संस्कृतीचे जतन करायचे असेल तर शिक्षक प्रशिक्षणापुढे निर्माण झालेल्या आव्हानांना प्रभावी नियोजनाच्या माध्यमातून तोंड देणे आवश्यक आहे. आज शिक्षक प्रशिक्षण संस्थांची संख्या मोठया प्रमाणात वाढल्याने गुणवत्तेसाठी संशोधनात्मक कामकरणाऱ्या शिक्षक प्रशिक्षण संस्थांचे अस्तित्त्व धोक्यात आलेले आहे त्यामुळे शिक्षक प्रशिक्षणाचा दर्जा खालवला आहे. शिक्षक प्रशिक्षणाचे मोठया प्रमाणावर बाजारीकरण झाले आहे. आज प्रशिक्षणाची भूमीका न राहता त्याला बहिस्थ शिक्षणाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. शिक्षक प्रशिक्षणाकडे हुशार व बुध्दिवान विद्यार्थ्यांनी पाठफीवली आहे कारण शिक्षक प्रशिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने विद्यार्थ्यांनी शिक्षक प्रशिक्षणाकडे पाठ फिरवलेली आपणास दिसते. प्रभावी व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या शिक्षक प्रशिक्षण संस्थांचेच अस्तित्त्व टीकवण्यासाठी सर्व सोई सुविधांनी युक्त शिक्षक प्रशिक्षण संस्थांनाच मान्यता दयावी. इतर संस्था बंद कराव्यात. ज्यामुळे शिक्षक प्रशिक्षणाचा गुणवत्तापूर्ण दर्जा टिकून राहण्यास मदत होईल व बुध्दिवान शिक्षक तयार होण्यास मदत मिळेल.

शिक्षक प्रशिक्षणाची सद्यस्थिती :-

१. अपूर्ण अभ्यासक्रमाची रचना :- शिक्षकी पेशासाठी आवश्यक असणाऱ्या अभ्यासक्रमाचा अपूरेपणा दिसून येतो. जीवन उपयोगी व आवश्यक विषपयांचा अभ्यासक्रमात समावेश नाही यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्यक्ष शाळेवर गेल्यावर अध्यापन करतांना अनेक समस्या जाणवू लागल्या आहेत. परीक्षा पध्दतीतील तोच तोचपणा, तीच अध्यापन पध्दती, विषयातील तोच तोचपणा असे प्रश्न निर्माण झाल्याने परिपूर्ण प्रशिक्षण प्रशिक्षणार्थ्यांना मिळत नाही.

२. शिक्षकी पेशाची फारकत :- आज शिक्षकी पेशाकडे आदराने पाहिले जात नाही. एक व्यावसाय चालवणारा दुकाणदार म्हणून शिक्षकाकडे पाहिले जाते. प्रशिक्षण संस्थांकडे आज पैसा कमवणारे साधन म्हणूणच त्यांच्याकडे पाहिले जाते. एक सेवा म्हणून त्याकडे पाहिले जात नाही.

३. विषय ज्ञानाची उणिव :- शिक्षक प्रशिक्षण संस्थेमध्ये काम करणाऱ्या शिक्षकाकडे पुरेशा विषय ज्ञानाचा अभाव जाणवतो विषय ज्ञानाकडे लक्ष दिले जात नाही. आपला विषय आपण कसा शिवविणे अपेक्षीत आहे त्यासाठी आपणाकडे कोणते विषय ज्ञान आवश्यक आहे. याकडे विशेष असे लक्ष दिले जात नाही शिक्षकांची भरती करतांना प्रशिक्षण महाविद्यालयांनी या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

४. शैक्षणिक सुविधांची कमतरता :- प्रशिक्षण संस्थेमध्ये ज्या सुविधा असणे आपवश्यक आहे त्या सुविधा आज उपलब्ध नाहीत. भौतीक व मानवी साधनांची कमतरता तर आहेच, त्याच बरोबर अध्यापन विषयात आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक साधनांची ही कमतरता जाणवते त्यामुळे अध्यापणात तोच तो पणा निर्माण झाल्याने अध्यापन कंटाळवाणे बनते.

५. गुणवत्ता पूर्ण संशोधन कार्याचा अभाव :- खऱ्या अर्थाने शिक्षकी पेशामध्ये गुणवत्ता पूर्ण संशोधन वृत्तीचा विकास होणे आवश्यक आहे. आज संशोधन वृत्तीचा काही प्रमाणात विकास झालेला आहे पण कॉपी राईट संशोधन होऊ लागली आहेत. हे संशोधने फक्त पदवी प्राप्त करण्यापुरतेच मर्यादित झाली आहेत. आजच्या संशोधामध्ये नवीन संकल्पना, तंत्रे, नवनिर्मीती याकडे दूर्लक्ष झालेले दिसत आहे. कारण अभ्यासक्रमात ही त्या विषयांचा समावेश नसतो व विद्यार्थी व शिक्षकांचाही त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोण उदाशिन व नकारात्मक आहे.

६. समाजाचा शिक्षकी पेशाकडे पाहण्याचा दृष्टीकोन :- शिक्षक हा सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक आहे. समाजाला चांगल्या वाईटाची जाणिव शिक्षकच करून देतो. पण पूर्वीसारखा शिक्षकी पेशा विषयी लोकांच्या मनात आदर दिसत नाही. आज डॉक्टर, इंजिनिअर यांना समाजात मानाचे स्थान आहे. शिक्षकांना मात्र याठीकानी दुर्लक्षीले जाते. ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्याने शिक्षकाच्या पुढे विद्यार्थी जाऊ लागला आहे. याचे कारण म्हणजे शिक्षकी पेशाकडे असणारे अपुरे ज्ञान याला कारणीभूत असू शकते. त्याच बरोबर शिक्षक भरतीमध्ये होणारी हेराफेर ही बाब खऱ्या अर्थाने कारणीभूत आहे.

७. विद्यार्थ्यामध्ये बेशिस्तिचे वातावरण :- आज विद्यार्थ्यामध्ये शिक्षणाप्रती अनास्था दिसून येते. शिक्षक व विद्यार्थ्यामध्ये शिक्षक कोण आणि विद्यार्थी कोण हे ओळखणे कठीण झाले आहे. विद्यार्थ्यांना घर बसल्या शिक्षण असावे व जादा कष्ट न करता चांगले यश संपादनुक मिळावी ही पोकळ अपेक्षा वाढली आहे. आज विद्यार्थ्यामध्ये सहनशिलता राहीलेली नाही. लहानसहान गोष्टीवरून विद्यार्थ्यी नकोसलेल्या गोष्टी करून लागला आहे. याला टेलिव्हीजन व सर्व प्रकारची प्रसार माध्यमे करणीभूत आहेत. ऐवढेच नव्हेतर विद्यार्थी पालक, शिक्षक व शासन यंत्रना यांना ब्लॅकमेल करू लागले आहेत. या ब्लॅकमेलच्या तंत्रामुळे विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य होऊ लागल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये बेशिस्तीचे वातावरण तयार झालेले आहे.

८. गुणवत्ता वाढीच्या संधी कमी :- गुणवत्ता विकासासाठी पुरेशे प्रयत्न केले जात नाहीत. गुणवत्तेचा विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न होणे आवश्यक आहे. प्रशिक्षण संस्थेपासून या कार्याची सुरूवात होणे आवश्यक आहे. कारण प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थी हा उदयाचा शिक्षक आहे. जेव्हा प्रशिक्षण संस्थेतील व्यवस्थापन, प्रशासन, शिक्षक या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देत नाहीत तो पर्यंत शिक्षण संस्थांची गुणवत्ता वाढणे अश्यक्य आहे.

९. शिक्षक संस्थांचा व्यावसायीक दृष्टीकोन :- आज प्रत्येक संस्था एक व्यावसायीक दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन कार्य करत आहे. समाज सेवेचे वृत्त म्हणून कोणतीच संस्था कार्य करतांना आज दिसत नाही. शिक्षण क्षेत्रात पेशाला

जास्त महत्त्व प्राप्त झाल्याने शिक्षण क्षेत्र हे धनिकांचे व्यापार केंद्र बनले आहे. पैसा मिळवणे या हेतूने लोक शिक्षण क्षेत्रात संस्थाकाडू लागले आहेत. त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता खालावल आहे.

१०. अभ्यासक्रमात बदलाची आवश्यकता / अभ्यासक्रमातील तोच तोपणा :- दहा वर्षा पूर्वी जो अभ्यासक्रम होता तोच अभ्यासक्रम आज ही आहे. बदलत्या गरजा बरोबर अभ्यासक्रम बदलणे आवश्यक होते. पण अभ्यासक्रमात बदल झालेला नाही. कालबाहय झालेल्या गोष्टी जीवन जगण्यासाठी पुरेशा उपयोगी पडत नाहीत. नव नवीन तांत्रिक शिक्षणाचा व लोकांच्या गरजा व व्यावसायाभीमूख उपक्रमांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करणे आवश्यक आहे. या गोष्टीचा विचार करूनच अभ्यासक्रमात दर चार ते पाच वर्षाला बदल होणे आवश्यक आहे.

११. तज्ज्ञ मार्गदर्शकाचा अभाव :- तज्ञ व गुणवत्ता पूर्ण मार्गदर्शकाचा अभाव आज जाणवत आहे. प्रशिक्षण संस्थामधून कार्य करणाऱ्या तज्ञ शिक्षकांचा अभाव असल्याने गुणवत्ता मिळत नाही. आज बहुतांश शिक्षक व प्राध्यापकांना अध्यापनाचा उददेश समजलेले नाहीत. नव्हे आपली जबाबदारी काय आहे अध्यापन कसे, काय करावे त्यासाठी कोणते तंत्र वापरावे या गोष्टी ही पुरेशा माहित नाहीत. कागदावरील गुण विचारात धरून आज गुणवत्ता ठरवली जाते. पण त्या विद्यार्थ्यांना व्यवहारात कसे वागावे , कसे बोलावे त्याच्या अनुभवात्मक ज्ञान म्हणजे प्रात्यक्षिक ज्ञान या गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे.

१२. शिक्षक प्रशिक्षण संस्थाकडे शासणाचे होणारे दुर्लक्ष :- शिक्षक प्रशिक्षण संस्थांना शासनाने मान्यता दिली खरी पण त्याच संस्थेची पुन्हा तपासणी करणे आवश्यक आहे. प्रशिक्षण संस्थेची तपासणी वेळेवर केली जात नाही. जरी झ ाली तरी वस्तुनिष्ठपणे परिक्षण होत नाही. किंवा त्याचे सखोल मूल्यमापण होत नाही. प्रशिक्षण संस्थेची गोपणीय वस्तूनिष्ठ तपासणी होणे आवष्यक आहे. पैसा व वशिला या बाबीमूळे प्रशिक्षण संस्थेचे मूल्यमापण बरोबर होत नाही.

१३. प्रशिक्षणात नवीन तंत्रज्ञानाचा वापर होणे आवश्यक आहे औद्योगीकीकरणाचा विकास झपाटयाने होऊ लागला आहे. त्याच बरोबर इलक्ट्रॉनिक वस्तूमुळे नवनवीन बाबी समोर येऊ लागल्या आहेत. या बाबीचा विचार करून शिक्षक प्रशिक्षणात ही अशा साधनांचा वापर होणे आवश्यक आहे. त्या साधनांच्या माध्यमातून प्रत्येक शिक्षकाने स्वतःला बदलून अध्यापन करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे आज शिक्षक प्रशिक्षण संस्थेपुढे अनेक समस्या निर्माण झालेल्या आपणास दिसत आहेत. नव्हे या समस्या वाढतच चालल्या आहेत. या समस्या वाढतच राहील्या तर गुणवत्तेत वाढ होणे अवश्यक आहे त्यासाठी मानवी गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रम तयार करून तो विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. अध्यापक विद्यालये व महाविद्यालये यांच्या गुणवत्तवाढीसाठी नॅक व्दारे तपासणी होणे आवश्यक आहे.

<u>अध्यापक महाविद्यालयांच्या गुणवत्ता विकासात नॅकची भूमिका</u> :-

नॅक ही राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परीषदेचे संक्षिप्त रूप आहे. १९८६ च्या राष्ट्रीय धारेणातून भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तेच्या मूल्यमापणाची संकल्पना पुढे आली. उच्च शिक्षणातील गुणवत्तेची होणारी घसरण थांबवून गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करण्यासाठी नॅकची स्थापना करण्याचे ठरले त्यानुसार दि. १६ सप्टेंबर १९९४ रोजी विद्यापीठ अनुदान कायदा १९५६ अंतर्गत राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेची स्थापना करण्यात आली.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पामळीवरील उच्च शिक्षणात गुणवत्तेचा विकास व्हावा या हेतूने या नॅकची स्थापना करण्यात आली देशातील सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या कामगिरीवरून मूल्यांकन करून त्यांना अधिकार व मान्यता देणे हे नॅकचे प्रमुख कार्य आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तावाढीसाठी प्रोत्साहण देणे, गुणवत्ता वाढीबरोबरच उच्च शिक्षणावर होणारा सरकारचा खर्च कमी करणे, सामाजीक व खाजगी संस्थांचा सहभाग वाढविणे, जागतीक स्पर्धेत उतरूशकणारे विद्यार्थी घडवणे, रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यास प्रवृत्त करणे इत्यादी प्रमुख उदिदष्ट नॅकने निश्चित केलेली आहेत. उच्च शिक्षण संस्थांनी स्वंयमूल्यमापन करावे. आर्थिक बाबतीत स्वावलंबी व्हावे इ. उदिदष्टे नॅक समोर होती.

शिक्षण संस्थांचा गुणात्मक दर्जा वाढविण्याच्या सात कसोटया नॅकने सूचविल्या आहेत. अभ्यासक्रमाची उपलब्धता, लवचिकता, विषयाशी संबंधीत उपक्रम राबवणे अध्यापन अध्यापनास अग्रक्रम देणे. विविध अध्यापन पध्दतीचा अवलंब करणे. विद्यार्थ्यांच्या विविध गुणांचा विकास करणे शैक्षणिक व्यवस्थापन करणे या बाबी विचारात घेतल्या जात असत. या बाबीवरच त्या महाविद्यालयाची गुणवत्ता ठरवली जात होती.

नॅकच्या माध्यमातून अध्यापक महाविद्यालयांची तपासणी तर होत आहेच पण अध्यापक विद्यालयांची ही तपासणी होणे आवश्यक आहे. तर नॅक व्दारे अध्यापक विद्यालयांची तपासणी झाली तर अध्यापक विद्यालयांच्या भौतीक व मानवी सुविधांत सुधारणा होईल पण गुणात्मक दृष्टया ही फायदा होणार आहे. त्यामुळे शिक्षकी पेशाच्या गुणवत्तेत वाढ झाल्याशिवाय राहणार नाही. यावरून अध्यापक महाविद्यालयोच्या तपासणीतून बरेच फायदे होऊ शकतात हे आपल्या लक्षात येईल.नॅकची स्थापना झाली खरी पण आज ही ८० % विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयांची नॅकव्दारे तपासणी झालेली नाही, तपासणी करुन घेण्यासाठी अध्यापक महाविद्यालयावर कडक बंधने लादने आवश्यक आहे.

१९८६ च्या धोरणानुसानर १९९४ ला नॅकची स्थापना करण्यात आली या नॅकच्या तपासणीमूळे संस्थामधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ झाली आहे.

१. नॅकच्या तपासणीमुळे स्वत:ची बलस्थाने व कमतरता यांची जाणीव होत. म्हणजे नॅकमुळे स्वंय:मूल्यमापणाची सवय लागली जाते यामुळे संस्थेला सवत:ची बलस्थाने लक्षात येऊन त्यांचा उपयोग संस्थेच्या विकासासाठी करता येतो व असलेल्या कमतरता नाहीस्या करण्यासाठी त्याचा उपयोग होतो.
२. तपासणीमुळे संस्थेच्या ध्येय, उदिदष्टांकडे संस्थेला लक्ष देता येईल, कालबाहय झालेली उदिदष्टे बदलून नवीन उदिदष्टांचा समावेश करून नवनवीन उपक्रम राबवता येतील संस्थेला आपल्या संस्थेच्या उदिदष्टांकडे झालेल्या दुर्लक्षांची जाणीव नॅकने करून दिली आहेच पुढे ही त्याचा उपयोग होईल.
३. अभ्यासक्रमातील बदलाला वाव मिळतो. अभ्यासक्रम पूर्णकरण्यासाठी लागणारा वेळ शुल्क यामध्ये लवचिकता येण्यास मदत होते. त्याच बरोबर अभ्यासक्रम लक्षात घेऊन योग्य व पात्र विद्यार्थ्यांना संस्था प्रवेश देतील.
४. नॅकच्या तपासणीमुळे अध्यापक विद्यालये व महाविद्यालयातील अध्ययन व अध्यापनात ही सुधारणा होण्यास मदत होईल नॅकने अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन या गोष्टीवर विशेष भर दिलेला आहे. त्यामुळे या क्षेत्रात जास्त लक्ष पुरवण्याकडे कल असेल त्यामुळे वेगवेगया अध्यापन पध्दतीचा शिक्षक वापर करतील व आपल्या अध्यापनातील तोच तोपणा नष्ट करतील अध्यापनात शैक्षणिक साधनांचाही वापर करण्यास त्यांना प्रेरणा मिळेल.

५. नॅकच्या तपासणीमध्ये विद्यार्थ्यांच्या विकासालाही महत्त्व देण्यात आले आहे. अभ्यासकपूरक व अभ्यासेत्तर उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असणे आवश्यक आहे. या व अशा अनेक बाबीकडे नॅकने लक्ष पुरविले आहे. त्यामुळे अध्यापक विद्यालयांच्या व महाविद्यालयाच्या गुणवत्तेत वाढ होण्यास मदत होईल.

६. कार्यालयीन कामात सुधारणा करणे महत्त्वाचे आहे कोणते ही पत्र किंवा कोणतीही फाईल ताबडतोब आपणाला सापडणे आवश्यक आहे. त्यांच्या नोंदी कशा असाव्यात या बाबीकडे नॅकने आपले लक्ष केंद्रीत केले आहे.

७. संस्थेच्या कार्यात आधुनिकता येण्याच्या दृष्टीने नॅकने सर्व कार्यालये ही संगणकीकरणात येणे आवश्यक आहे. असे सुचविले त्याच बरोबर इंटरनेटचा वापर केला जावा व त्या व्दारे अध्यापन व कार्यालयीन कार्यात सुधारणा करावी असे नॅकने सुचविले आहे.

८. प्रत्येक अध्यापक महाविद्यालयामध्ये संशोधनात्मक कार्यात सहभाग व वाढ होणे आश्यक आहे नॅकने आपले उदिदष्ट महत्त्वाचे मानले आहे. संशोधन कार्यामुळे विविध विषयावर चर्चासत्रे, परिषदा, परिसंवाद आयोजीत करण्यात येतात. त्यामुळे अध्यापकांच्या ज्ञानात वाढ होऊन नवनिर्मितीकडे वाटचाल होण्यास मदत होते.

९. नॅकच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधामध्ये वाढ होईल.

१०. पायाभूत सुविधामध्ये वाढ तर होईलच शिवाय संस्थेच्या नावलौकीकातही भर पडेल.

११. अध्यापक महाविद्यालयांची नॅक व्दारे तपासणी झाली व नॅकच्या पात्रतेत संस्था उतरली तर संस्थेला वाढीव फिस तर मिळेलच पण संस्थेच्या उपलब्ध निधीमध्ये वाढ होईल.

१२. ज्या अध्यापक विद्यालयाकडे पाञ शिक्षक नाहीत व पुरेशा भौतिक सुविधा नाहीत अशा संस्था बंद करण्याची शिफारस नॅकने शासनाकडे व युजीसीकडे करावी असे केल्याने संस्था नियमानुसार कामे करतील.

अशा प्रकारे आजही आव्हाणे पेलवण्यासाठी नॅकव्दारे अध्यापक महाविद्यालयांची तपासणी होणे आवश्यक आहे त्यामुळे गुणवत्तेत वाढ होण्यास मदत होईल व दर्जेदार शिक्षक मिर्माण होतील.

संदर्भ सूची

१. ब्रिजमोहन दायमा, २००३, नॅकला सामोरे जातांना, विद्याभारती प्रकाशन, लातूर
२. पारसनिस न. रा., २००२, शिक्षकांचे प्रशिक्षण, नूतन प्रकाशन, पुणे
३. नरवणे मीनल, १९९९, भारतीय शैक्षणिक आयोग व समित्या, नूतन प्रकाशन, पुणे
४. गुरव कृष्णराव, २००५, सेट,नेट परीक्षा शिक्षणशास्त्र, डायमंड प्रकाशन, पुणे
५. घोरमोडे के. यु. / घोरमोडे कला, २००८ शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, विद्याप्रकाशन, नागपूर

www aiirjournal.com